महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक (भू-विकास बँक) या बँकेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा. मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय, क्रमांकः- **एलडीबी-१०१३/प्र.क्र.६९९/७-स,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांकः- १७ डिसेंबर,२०१४.

**<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेबाबत (भू-विकास बँक) धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि. २७.११.२०१४ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी मा. मंत्रीमंडळ उपसमिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय:-</u>**

महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेबाबत (भू-विकास बँक) दि. २७.११.२०१४ रोजी मा. मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करुन शासनास योग्य त्या शिफारशी करण्यासाठी मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे मा. मंत्रीमंडळ उपसमिती नेमण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| मा. मंत्री (वित्त व नियोजन) | -- | अध्यक्ष |
| मा. मंत्री (महसूल, मदत व पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास,कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मस्त्यव्यवसाय,राज्य उत्पादन शुल्क) | -- | सदस्य |
| मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम) | --- | सदस्य |
| सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | --- | सदस्य सचिव |

या समितीने महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेबाबत (भू-विकास बँक) दि. २७.११.२०१४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत ठेवण्यात आलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करुन शासनास शिफारशीसह अहवाल सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४१२१७११४९४४७५००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(क. कि. पारकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (वित्त,नियोजन व वने) यांचे खाजगी सचिव

३) मा. मंत्री (महसूल,अल्पसंख्याक विकास,कृषि,पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मस्त्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव

४) मा. मंत्री (सहकार,पणन व वस्त्रोद्योग,सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव

५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

६) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

७) सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग

८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,

९) निवड नस्ती.